भगवान बुद्धांचे प्रथम महाश्रावक

# अञ्ञासिकोण्डञ्ञ

(अन्यासिकौंडण्य)

(रात्रज्ञांमध्ये अग्र )

हिन्दी पुस्तकाचा मराठी अनुवाद



विपश्यना विशोधन विन्यास

भगवान बुद्धांचे प्रथम महाश्रावक

# अञ्ञासिकोण्डञ्ञ

(अन्यासिकौंडण्य)

(रात्रज्ञांमध्ये अग्र)

**हिन्दी पुस्तकाचा मराठी अनुवाद**

**विपश्यना विशोधन विन्यास**
**धम्मगिरी इगतपुरी**

# अञ्ञासिकोण्डञ्ञ

पुस्तक कोडः **M51**

© विपश्यना विशोधन विन्यास
सर्वाधिकार सुरक्षित

प्रथम आवृत्ती : जानेवारी 2025

**मूल्य: ₹**
**Price: Rs.**

**ISBN** 978-81-7414-490-4

**प्रकाशक:**
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - ४२२४०३
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र
फोन: ०२५५३-२४४९९८, २४३५५३, २४४०७६,
२४४०८६, २४४१४४, २४४४४०
Email: vri_admin@vridhamma.org
Website: www.vridhamma.org

**मुद्रक:**
**अपोलो प्रिंटिंग प्रेस**
२५९, सीकॉफ लिमिटेड, ६९ एम. आय. डी. सी.,
सातपुर, नाशिक-४२२००७, महाराष्ट्र

## भगवान बुद्धांची उद्घोषणा

**"एतदग्गं, भिक्खवे, मम सावकानं भिक्खूनं रत्तञ्ञूनं यदिदं अञ्ञासिकोण्डञ्ञो"**

*– अङ्गुत्तरनिकाय-१.१.१८८*

भिक्षूंनो, माझ्या भिक्षू-श्रावकांत
रात्रज्ञांमध्ये अग्र (श्रेष्ठतम) आहेत "अन्यासिकौंडण्य."

# अञ्ञासिकोण्डञ्ञ

भगवान बुद्धांचे प्रथम महाश्रावक

# अञ्ञासिकोण्डञ्ञ

## विषयानुक्रमणिका

**प्रकाशकीय** .................................................7

**बुद्ध-शासनाचे सर्व प्रथम शैक्ष्य** ............................9

अचूक भविष्यदर्शी ..................................... 9

प्रबळ धर्मसंवेग जागला ............................... 10

विश्वास डळमळला ..................................... 11

अञ्ञासि वत, भो कोण्डञ्ञो!........................ 12

पंचवर्गीय भिक्षू अरहंत झाले ......................... 16

**धर्माप्रति निष्ठा** ..............................................17

कौंडण्यचे अधिष्ठान .................................... 17

एकांतवासाचा संकल्प ................................. 17

छद्दन्त भवनात एकांतवास ............................ 19

मिथ्या संकल्पांपासून मुक्ती ........................... 20

**कौंडण्यचे गुण** ...............................................22

देवेंद्र शक्रला उपदेश .................................... 22

भाच्याला योग्य स्थान दिले ............................ 22

वंगीसद्वारे कौंडण्यची प्रशंसा .......................... 23

धर्म प्रतिवेधनात अग्र .................................. 24

**पूर्व-जन्मांचे प्रसंग ........................................... 25**

भगवान पदुमुत्तरांची भविष्यवाणी................... 25

अविरतपणे पुण्य कर्म ................................. 26

**परिनिर्वाण .................................................... 28**

**परिशिष्ट ...................................................... 29**

धर्मचक्राचे दोन प्रकार ................................ 29

श्रावक आणि महाश्रावक ............................. 30

**विपश्यना साधना केंद्र ...................................... 32**

# प्रकाशकीय

सम्यक संबुद्धांनंतर कौंडण्यच पहिली व्यक्ती होती जिने धर्माचे प्रतिवेधन केले, म्हणून भगवानांच्या मुखातून हे उदानाचे शब्द बाहेर पडले **'अञ्ञासि वत, भो, कोण्डञ्ञ अञ्ञासि वत, भो कोण्डञ्ञ!'** (अरे! कौंडण्यने जाणले, कौंडण्यने जाणले) तेव्हापासून त्यांचे नाव पडले अञ्ञासिकोण्डञ्ञ. कौंडण्य कपिलवस्तुजवळ वसलेल्या द्रोणवस्तुचे नागरिक होते. ते तिन्ही वेदांचे आणि महापुरुष लक्षण शास्त्राचे प्रकांड पंडित होते.

शाक्यराज शुद्धोदनाच्या पुत्राच्या नामकरण-संस्कारावेळी शिशु सिद्धार्थची सम्यक संबुद्ध होण्याची भविष्यवाणी फक्त त्यांनीच केली होती. म्हणून ते एकोणतीस वर्षांपर्यंत राजकुमार सिद्धार्थच्या संन्यास घेण्याची वाट पाहत राहिले होते. जेव्हा कुमाराने संन्यास घेतल्याचे माहित झाले तेव्हा तेही आपल्या चार सहकाऱ्यांसोबत घर सोडून निघून गेले. सहा वर्षांपर्यंत ते आपल्या सहकाऱ्यांसहित संन्यासी सिद्धार्थच्या बरोबर राहिले, पण जेव्हा सिद्धार्थने भोजन ग्रहण करण्यास सुरुवात केली तेव्हा त्याला तप-भ्रष्ट झाल्याचे समजून त्यांनी त्याची साथ सोडून दिली.

भगवानांनी धर्मचक्र प्रवर्तन केल्यानंतर हे पाचही ब्राह्मण अरहंत झाले. यानंतर कौंडण्यची धर्माप्रति निष्ठा इतकी दृढ झाली की त्यांना साधनेमध्ये लीन झालेले दाखवून भगवानांनी सांगितले– ज्याचे मन-चित्त निर्विकार झाले त्याची प्रशंसा देव आणि ब्रह्माही करतात. पुढे भगवान म्हणाले– भिक्षूंनो! माझ्या श्रावकांमध्ये जो सर्वात प्रथम प्रव्रजित झाला, ज्याने सर्वात प्रथम धर्माचे प्रतिवेधन केले, जो दीर्घवेळ रात्री साधना करुन रात्रज्ञ (रत्तंञ्ञु) आणि क्षीणाश्रव झाला तो आहे अञ्ञासिकोण्डञ्ञ.

आयुष्मान कौंडण्य एकांतप्रिय होते. भिक्षूंमध्ये सर्वात वरिष्ठ श्रावक

असल्यामुळे जेतवनामध्ये भगवान सोडून सर्व– दोन्ही अग्रश्रावक, सर्व महाश्रावक तसेच अन्य श्रावक त्यांचा आदर-सत्कार करीत असत ज्यामुळे त्यांना खूप संकोच वाटत असे. म्हणून त्यांनी भगवानांची अनुमती घेतली आणि ते एकांतवासासाठी हिमालयाच्या परिसरात निघून गेले.

एकदा त्यांनी देवेंद्र शक्राला उपदेश दिला. आपला भाचा कुमार पुण्णला प्रेरित करुन प्रव्रजित केले. एकदा वंगीस थेर त्यांच्या प्रशंसेत म्हणाले– आपण महान प्रतापी, त्रैविद्य आणि परिचित्त ज्ञाते आहात. भगवानांची अनुमती घेऊन त्यांनी हिमालय परिसरातच परिनिर्वाण प्राप्त केले. तिथेच त्यांचे सेवक हस्तीनागांनी त्यांचा अंतिम संस्कार केला.

**विपश्यना विशोधन विन्यास**